मंत्रिमंडळ निर्णय 1

नियमित कर्ज भरणाऱ्या

शेतकऱ्यांसाठी प्रोत्साहनपर योजना; शेतकऱ्यांना ₹50 हजारांपर्यंत लाभ

- महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देणार
- 13.85 लाख शेतकऱ्यांना लाभ होणार
- नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना 2017-18 ते 2019-21 या 3 आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही 2 वर्षांत पीककर्जाची उचल करून नियमित परतफेड केली असल्यास लाभ
- शेतकऱ्यांना अधिकाधिक 50 हजार रुपयांपर्यंत लाभ
- शेतकऱ्याचा मृत्यू झाला असेल आणि वारसांनी कर्जफेड केली तरी योजना लागू
- नैसर्गिक आपत्तींमुळे कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना सुद्धा ही योजना लागू

---

➡ मंत्रिमंडळ निर्णय 2

महावितरण आणि 'बेस्ट'मध्ये सुधारित वितरण क्षेत्र योजना

- राज्यात सुधारित वितरण क्षेत्र योजना महावितरण आणि बेस्ट उपक्रमामार्फत राबविण्यास मान्यता
- सुधारणांवर आधारित आणि अपेक्षित परिणाम साध्य करणारी योजना

- मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा निर्मिती करणार

-महावितरण कंपनीच्या 39,602कोटी आणि बेस्ट उपक्रमासाठी 3461 कोटी रुपयांच्या सविस्तर प्रकल्प आराखड्याला मान्यता

-राज्य सरकारमार्फत महावितरण कंपनीस देय असलेली गेल्यावर्षीची थकित अनुदानाची रक्कम आणि चालू वर्षाचे अग्रीम अनुदान देण्यास मान्यता

- ग्राहकांना दर्जेदार सेवा आणि स्मार्ट मीटर

- वीज वितरणातील हानी कमी करणार

---

➡ मंत्रिमंडळ निर्णय 3

उपसा सिंचन योजनांना वीज दरात सवलत !

- अतिउच्चदाब, उच्चदाब आणि लघुदाब उपसा सिंचन योजना; ग्राहकांना वीज दरात सवलत

- अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजना ग्राहकांना 1.16 रुपये प्रतियुनिट आणि स्थिर आकारात 25 रुपये प्रति केव्हीए सवलत मार्च 2023 पर्यंत कायम

- लघुदाब उपसा जलसिंचन योजनांना प्रतियुनिट 1 रुपया आणि स्थिर आकारात 15 रुपये प्रति हॉर्सपॉवर प्रतिमाह सवलत मार्च 2023 पर्यंत कायम

---

➡ मंत्रिमंडळ निर्णय 4

सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती

- राज्यातील दुय्यम न्यायालयांत कार्यरत न्यायिक अधिकाऱ्यांप्रमाणे सेवानिवृत्त न्यायिक अधिकाऱ्यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती

- मा. न्या. शेट्टी आयोग आणि मा. न्या. पद्मनाभम समितीच्या शिफारसींच्या आधारे निर्णय

- दरमहा 1500 रुपये भत्ता देणार

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 5

- विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणात सहसचिव विधी गट अ संवर्गाचे पद निर्माण करण्यास मान्यता

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 6

लोणार सरोवर जतन, संवर्धनासाठी 370 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर

- बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर जतन, संवर्धन आणि विकास आराखड्यास मान्यता

- 370 कोटीचा आराखडा, मोठ्या प्रमाणात विकास कामे

- 6 मंत्रालयीन विभाग देखरेख ठेवणार

- पर्यटक वाढीसाठी सुद्धा उपाययोजना

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 7

- वैद्यकीय शिक्षण विभागाच्या नियंत्रणातील 15 शासकीय महाविद्यालयांत श्रेणीसुधार योजनेत राज्य सरकारचा हिस्सा

- केंद्र आणि राज्य सरकारच्या वैद्यकीय महाविद्यालयांत एमबीबीएसच्या जागा वाढण्यासाठी गुणवत्ता सुधारणार

- ₹360 कोटी मंजुर

- आवश्यक पदनिर्मिती सुद्धा करणार

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 8

राज्यात 3 नवीन समाजकार्य महाविद्यालय

- राज्यात सामाजिक न्याय विभागाच्या नियंत्रणाखाली कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर 3 नवीन समाजकार्य महाविद्यालय स्थापनेस मंजुरी

- संत तुकाराम सामाजिक संस्था, साक्री, धुळे

- अश्वमेध बहुउद्देशीय शैक्षणिक आणि सामाजिक संस्था, धाराशिव

- दिशा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, जालना

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 9

तीन जलसंधारण प्रकल्पांसाठी निधी मंजूर

- ब्रम्हगव्हाण उपसा सिंचन योजनेसाठी ₹890.64 कोटी

(पैठण तालुक्यातील 65 गावांतील 20,265 हेक्टर क्षेत्राला लाभ)

- जळगाव जिल्ह्यातील वाघुर प्रकल्पासाठी ₹2288.31 कोटी

- भातसा पाटबंधारे प्रकल्प, शहापूर, ठाणेसाठी ₹1491.95 कोटी

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 10

मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र

- हिंगोली जिल्ह्यात मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यास मंजुरी

- 100 कोटी रुपयांस मंजुरी, गरजेप्रमाणे निधी

- राज्यात हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण लागू करण्यास मंजुरी

——

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 11

राजकीय/सामाजिक आंदोलनातील खटले मागे

- राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील 31 मार्च 2022 पर्यंतचे खटले मागे
- गणेशोत्सव, दहीहंडी, इत्यादी सार्वजनिक उत्सव काळातील कार्यकर्त्यांवरील खटले मागे
- कोरोना काळातील हल्ले आणि मालमत्ता नुकसान असे गंभीर गुन्हे वगळता इतर गुन्हे सुद्धा मागे घेणार

———

➡️ मंत्रिमंडळ निर्णय 12

सर्वांसाठी घरे योजनेत आता भूमिहीन लाभार्थ्यांसाठी जागा

- ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रमाअंतर्गत पात्र, मात्र भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणार
- पं. दीनदयाल उपाध्याय जागा खरेदी योजनेत PMAY च्या धर्तीवर मुद्रांक शुल्क केवळ ₹1000
- मोजणी शुल्कात 50% सवलत
- जमीन खरेदीसाठी तुकडेबंदी कायद्यातील अट लागणार नाही, त्यासाठी नियमात सुधारणा करणार
- लाभार्थ्यांच्या पसंतीनुसार दुमजलीऐवजी चार मजली इमारत
- ग्रामविकास विभाग जागेची उपलब्धता करून देणार
- स्थानिक स्तरावर 90 दिवसात मान्यतेची सक्ती